**अमरावतीमध्ये मकरसंक्रांत निमित्त राणा दाम्पत्याकडून पतंग महोत्सवाचे आयोजन** >> पान 2

**सामाजिक न्याय विभागामार्फत राबवण्यात येणाऱ्या योजना गरजुंपर्यंत प्रभावीपणे लाभ पोहोचवा- रामदास आठवले** >> पान 3

**शेतकऱ्यांनो, पारंपरिक पिकांबरोबर रेशीम शेतीचाही अवलंब करावा-जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील** >> पान 4

**सुविचार**

नैतिक मूल्ये आणि संस्कार हीच आपली खरी ओळख आहे.


दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 154 ■ बुधवार, दि. 15 जानेवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006






**प्रभास स्टारर 'द राजा साब' चित्रपटामधील पोस्टर रिलीज, पोंगल आणि मकर संक्रांतीच्या निर्मात्यांनी दिल्या शुभेच्छा**

आतील पान

# वाल्मिकला मोका लागताच परळी पेटली

## पोलीस स्टेशनबाहेर ठिय्या आंदोलन, परळीत कराड समर्थक आक्रमक



दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी : मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणावरून बीड जिल्ह्यातील वातावरण आधीच तंग झाले आहेत. तर, दुसरीकडे आता वाल्मिक कराडच्या समर्थकांनीदेखील आक्रमक पवित्रा घेत परळीत आंदोलन सुरू केले आहे. वाल्मिक कराडच्या समर्थकांनी टॉवरवर चढून आंदोलन केले. तर, कराडच्या आईने लेकाच्या सुटकेसाठी परळी पोलीस स्टेशनबाहेर आंदोलन सुरू केले आहे.**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाने बीडसह राज्यात एकच खळबळ उडाली. लोकांच्या दबावानंतर देशमुख हत्या प्रकरणाचा तपास सीआयडी आणि एसआयटीकडे सोपवण्यात आला. संतोष देशमुख हत्या प्रकरणात खंडणीचाही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याच गुन्ह्यात कराडला अटक करण्यात आली आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणातला मास्टरमाईंड हा वाल्मिक कराड असल्याचा आरोप होत आहे. पोलिसांचा त्यादृष्टीनेही तपास सुरू आहे.

परळीत आंदोलन, कराडची आईही मैदानात

वाल्मिक कराडच्या आईसोबत काही महिलांनीदेखील ठिय्या आंदोलनात सहभाग घेतला आहे. पोलीस स्टेशच्या गेटवर आंदोलन सुरू झाल्याने वातावरण तंग झाले आहे. वाल्मिक कराडला खोट्या गुन्ह्यात फसवण्यात आल्याचा आरोप वाल्मिक कराडच्या वृद्ध आईने केला आहे. फक्त राजकारण सुरू असून माझा मुलगा निर्दोष असल्याचे पारुबाई कराड यांनी सांगितले. माझ्या लेकावरील खोटे गुन्हे मागे घ्यावे, त्याला फसवण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

समर्थकांचे शोले स्टाईल आंदोलन

परळी शहर पोलीस स्टेशनबाहेर आंदोलन सुरू असताना दुसरीकडे परळीत वाल्मिक कराडचे समर्थक चांगलेच आक्रमक झाले. काही जणांना टॉवरवर चढून शोले स्टाईल आंदोलन केले. वाल्मिक अण्णांना खोट्या प्रकरणात फसवण्यात येत असल्याचा आरोप त्यांनी केला.

कराडला आज कोर्टात हजर करणार

खंडणी प्रकरणात गेल्या १३ दिवसांपासून पोलिस कोठडीत असलेल्या वाल्मिक कराड याला आज कोर्टात हजर केलं जाणार आहे. सीआयडीकडून कोर्टात सादर केल्या जाणाऱ्या तपासाच्या पुढील मुद्यांवर कराड याचा कोठडीतील मुक्काम थांबणार की लांबणार, हे ठरणार आहे. २९ नोव्हेंबरला मस्साजोग येथील अवादा कंपनीच्या पवन ऊर्जा प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांना २ कोटींची खंडणी मागितल्याप्रकरणी वाल्मिक कराड याच्यावर गुन्हा दाखल आहे. या गुन्ह्याचा तपास सीआयडीचे अधिकारी करत आहेत. या गुन्ह्यात वाल्मीक कराड याला १४ जानेवारीपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली होती. बीड शहर पोलिस ठाण्याच्या कोठडीत गेल्या १३ दिवसांपासून त्याची चौकशी सुरू आहे.





## एसटी कर्मचाऱ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्यात २५ खाटांचे रुग्णालय; परिवहन मंत्र्यांची घोषणा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** ओला , उबेर, रॅपिडो सारख्या खासगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या पुरवठादारांना एकाच नियमावलीअंतर्गत आणणार असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले. प्रवासी सुरक्षा, कार पुलींग, लायसन्स, ट्रॅफिक समस्या यासंदर्भातील पारदर्शक तक्रार यंत्रणा तातडीने तयार करण्याचे निर्देश मंत्री सरनाईक यांनी दिले. राज्यातील खाजगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या पुरवठादारांना एकाच शासकीय नियमनात आणण्यासंदर्भात आज मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी परिवहनचे अपर मुख्य सचिव, संजय सेठी, परिवहन आयुक्त विवेक भीमनवार, एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांच्यासह प्रवासी वाहतुक पुरवठादार कंपनीचे प्रतिनिधी दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते. दरम्यान, याच बैठकीत राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात एसटीच्या जागेवर २५ तर बोरिवलीत एसटी कर्मचाऱ्यांसाठी १०० खाटांचे रूग्णालय उभारणार आहे. मंत्री सरनाईक म्हणाले की, खाजगी प्रवासी वाहतूक पुरवठादार कंपन्यांसंदर्भात केंद्र सरकारने आणलेल्या धोरणाचा विचार करून, या कंपन्याना एकाच परिवहन नियमा अंतर्गत एकत्रित आणणे गरजेचे आहे. प्रवासी सुरक्षेला प्राधान्य देण्यात यावे. सर्व प्रवासी वाहतूक पुरवठादार कंपन्यांअतर्गत चारचाकी, बाईक, टॅक्सी यांचा समावेश करण्यात येणार आहे. बाईक चालविण्यासाठी महिला चालकांनाही प्राधान्य देण्यात यावे, जास्तीत जास्त रोजगार कसा निर्माण करता येईल यासाठी प्राधान्य द्यावे. तसेच त्यांच्या सुरक्षेसंदर्भात कंपन्यांनी उपाययोजना कराव्यात अशाही सूचना मंत्री सरनाईक यांनी दिल्या. खासगी वाहतूक व्यवस्था, सुस्थितीत असलेली वाहने, प्रवाशांची सुरक्षा, हेल्मेट, महिला चालकांची सुरक्षा, झीरो कमीशन सेवा इत्यादी बाबींचा वाहतूक धोरणात समावेश करण्यासंदर्भातील सादरीकरण यावेळी परिवहन आयुक्त विवेक भीमनराव यांनी केले.

राज्यातील अनेक बसस्थानके बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा, या तत्वावर विकसित करण्यात येत आहेत. या एस. टी.च्या प्रकल्पात प्रत्येक जिल्ह्यात २५ तर मुंबईतील बोरिवली येथील जागेवर १०० खाटांचे रूग्णालय एस. टी. कर्मचाऱ्यांसाठी सुरू करण्यात येणार आहे. या रूग्णालयात एस. टी. कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांसाठी महात्मा फुले जनआरोग्य योजनेतून उपचार करण्यात येतील, तसेच पाच लाखांपर्यंतच्या शस्त्रक्रियांचा खर्च राज्यशासन करेल, असेही मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले. सध्या राज्यभरात विविध ठिकाणी बांधा- वापरा आणि हस्तांतरित करा या तत्त्वावर एसटीच्या जागांचा विकास केला जात आहे. भविष्यात या रुग्णालयांमध्ये एसटी कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांना कॅशलेस वैद्यकीय सुविधा पुरवण्यात येतील जेणेकरून त्यांना इतर महाग खाजगी रुग्णालयात जाऊन खर्च करावा लागणार नाही. पुणे, कोल्हापूर, पूसद, वाशिम येथे रूग्णालय उभारण्यासंदर्भातील सादरीकरण यावेळी करण्यात आले.



## महिला व बालविकास विभागातील योजना, उपक्रमांना गती द्यावी - मंत्री आदिती तटकरे

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महिला व बालविकास विभागातर्फे महिला आणि बालकांच्या विकासासाठी विविध योजना व उपक्रम राबविण्यात येतात. या योजना व उपक्रमांना गती द्यावी, असे निर्देश महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी विभागाच्या आढावा बैठकीत दिले. यावेळी विभागाचे सचिव अनुपकुमार यादव उपस्थित होते.

यावेळी मंत्री कु. तटकरे यांनी राज्यातील महिला व बालकांच्या विकासासाठी राबविण्यात येणारा 'सक्षम अंगणवाडी आणि पोषण' उपक्रम, ' मिशन वात्सल्य ', ' मातृवंदना योजना ', 'वन स्टॉप सेंटर (सखी)' या योजना आणि उपक्रमांवर खर्च करण्यात येणाऱ्या निधी आणि विना खर्चित निधी याबाबत माहिती घेतली.

## नायलॉन मांजा विक्री करणारे हद्दपार, राज्यातील पहिलीच कारवाई

दैनिक आपला विदर्भ

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** नायलॉन विक्री करणाऱ्या जिल्ह्यातील ३४ जणांवर हद्दपारीची कारवाई करण्यात आल्याने खळबळ उडाली आहे. या सर्वांना १३ ते १५ जानेवारी असे तीन दिवस हद्दपार केले आहे. मांजा विक्री प्रकरणात हद्दपारीची ही संपूर्ण राज्यातील पहिलीच कारवाई आहे.





प्लास्टिक व इतर कृत्रिम वस्तूपासून बनविलेल्या नायलॉन मांजा या नावाने परिचित असलेल्या पक्क्या धाग्याचा वापर पतंग उडविण्याच्या सणाच्या वेळी करतात. त्यामुळे पक्ष्यांना व मानवी जीवितास तीव्र ईजा होते. अशा धाग्यांवर शासनाने बंदी घातलेली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक रिना जनबंधू यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यायी पर्यावरण पुरक धाग्याच्या वापरास प्रोत्साहन देण्यासाठी चंद्रपूर जिल्ह्यात अधिसूचना निर्गमित करून तसेच अधिसूचनेची प्रभावी अंमलबजावणीसाठी कार्यप्रणाली तयार करून चंद्रपूर जिल्ह्यात पोलीस ठाणे स्तरावर जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आले. तसेच सदर नायलॉन मांजावर प्रतिबंध घालण्यासाठी विशेष पथक तयार करून धाडी घालून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करून अशा धाग्यांवर बंदी घालण्यात आली.

सोमवार १३ जानेवारी २०२५ रोजी अपर पोलीस अधीक्षक रिना जनबंधू यांनी पोलीस स्टेशन चंद्रपूर येथील १९ इसम, पोलीस स्टेशन रामनगर येथील ८ इसम, पोलीस स्टेशन घुग्घुस येथील २ इसम, पोलीस स्टेशन दुर्गापूर येथील ४ व पोलीस स्टेशन मुल येथील १ इसम अशा एकूण ३४ जणांवर भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ मधील कलम १६३ (२) अन्वये १३ ते १५ जानेवारी पर्यत ३ दिवसाकरीता चंद्रपूर जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आलेले आहे.

आगामी सण उत्सव अनुषंगाने मोठ्या प्रमाणावर जिल्ह्यात नायलॉन मांजा विक्री करणाऱ्यांवर कारवाई सुरू आहे. सदरची कारवाई ही राज्यातील पहिलीच कारवाई असून सदर कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती रिना जनबंधू यांच्या मार्गदर्शनात पोलिसांनी केली.

## राज्यातील शाळांसाठी सीबीएसई पॅटर्न

### मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत निर्णय, शिक्षणमंत्र्यांची माहिती

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून मंत्रालयातील सर्वच विभागांसाठी पुढील १०० दिवसांच्या कामकाजाचा आढावा घेतला जात आहे. त्यानुसार शालेय शिक्षणामध्ये महाराष्ट्र पुन्हा आघाडीवर येणार असा विश्र्वास शालेय शिक्षण विभागाच्या बैठकीत त्यांनी व्यक्त केला. शिक्षण विभागाने गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी पाऊले उचलावीत असे निर्देश यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिले. राज्याच्या शालेय शिक्षण विभागाच्या वतीने १०० दिवसांच्या आराखड्याचे सादरीकरण करण्यात आलं. दरम्यान, या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी काही महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत, त्यानुसार राज्यातील शाळांमध्ये सीबीएसई पॅटर्नचा अंगीकार करून त्यात राज्याप्रमाणे आवश्यक बदल करण्यासंदर्भातही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सूचना दिल्या आहेत. शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनीही याबाबत माहिती दिली.



राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी मुख्यमंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीनंतर एबीपी माझाशी संवाद साधला. त्यावेळी, सीबीएसई पॅटर्नचा अंगीकार करून त्यात राज्याप्रमाणे आवश्यक बदल करणे, शाळांना गुणवत्तेनुसार रँकिंग देणे, एका केंद्रात किमान एका शाळेमध्ये दहावीपर्यंत शिक्षण व्यवस्था निर्माण करून त्या शाळा आदर्श तर त्यातील एक वर्ग स्मार्ट वर्ग करणार असल्याचं त्यांनी म्हटलं. त्यामुळे, राज्यातील सरकारी व अनुदानित शाळांमध्ये सुधारणा करण्यावर पुढील १०० दिवसांत शासनाकडून जोर देण्यात येत असल्याचे दिसून येते. तसेच, केंद्रीय शिक्षण पद्धतीचा गरजेनुसार अवलंबही केला जाईल. चालू वर्षात पहिलीच्या वर्गात सीबीएसई पॅटर्नचा विचार आपण करत आहोत, पुढच्या टप्प्यात सीबीएससी पॅटर्नच्या ज्या चांगल्या बाबी आहेत, त्या आपण शाळांमध्ये घेऊ, असे दादा भुसे यांनी म्हटलं. सन २०२६-२७ मध्ये सीबीएसई पॅटर्नचा वापर होईल, असेही शिक्षणमंत्र्यांनी म्हटलं. राज्यातील सर्व शाळांमध्ये यापुढे राष्ट्रगीतापाठोपाठ राज्यगीत होणं अनिवार्य असल्याचे मतही शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी व्यक्त केलं. राज्यातील अनेक शाळांमध्ये त्याची अंमलबजावणी होताना दिसत नाही. यापुढं राज्यातील सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये राष्ट्रगीता पाठोपाठ राज्यगीत लावणं सक्तीचं असल्याचे भुसे म्हणाले. मराठी भाषा प्रत्येक शाळात शिकवणं सक्तीचं असल्याचेही भुसे यांनी म्हटले.

### मुख्यमंत्र्यांनी काय केल्या सूचना

- संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त विद्यार्थ्यांना संविधानिक मूल्ये शिकविण्यावर भर द्यावा.
- शाळांमधील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड गुणवत्ता आहे. त्यांना घडविणारे उत्कृष्ट शिक्षक ही मोठी संपत्ती आहे, त्यांचा इतरांसाठी आदर्श म्हणून उपयोग करा.
- पूर्व प्राथमिक शिक्षणाची नोंदणी करून त्यांना कमीत कमी कोणत्या बाबी आवश्यक असाव्यात हे सांगून त्यांना प्रमाणपत्र द्या, पालकांचा विश्र्वास रहावा यासाठी हे प्रमाणपत्र त्यांनी दर्शनी भागात लावण्याची अट असावी.
- समूह शाळा ही अतिशय महत्त्वपूर्ण आणि आवश्यक बाब आहे. तथापि, कमी संख्या असणाऱ्या शाळांमधील विद्यार्थ्यांना समूह शाळांमुळे होणारे लाभ योग्य प्रकारे समजावून सांगा, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

## वन्य प्राण्यांचे हल्ले रोखण्यासाठी उपाययोजना – वनमंत्री गणेश नाईक

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** वन्य प्राणी त्यांचा अधिवास सोडून मानवी वस्तीत येऊ नयेत यासाठी उपाययोजना करण्यात येत असून ब्रिटिश कालखंडात केलेल्या उपाययोजना करणे आवश्यक आहे. वन्य प्राणी हे खाद्यासाठी मानवी वस्तीत प्रवेश करत असल्याने त्यांच्या अधिवासातच खाद्याची व्यवस्था होणे गरजेचे आहे. यामुळे वन्य प्राण्यांचे मनुष्यावर हल्ले होणार नाही, अशी माहिती वनमंत्री गणेश नाईक यांनी मंत्रालयातील पत्रकार परिषदेत दिली.

वाघ तसेच बिबट्यांच्या झालेल्या मृत्यूप्रकरणी वनमंत्री श्री.नाईक यांनी आज पत्रकार परिषद घेतली. जंगलांच्या कोर क्षेत्रात विविध प्रकारची फळ झाडे लावल्यास शाकाहारी प्राण्यांना त्या ठिकाणी खाद्य उपलब्ध होऊन मांसाहारी प्राण्यांची देखील खाद्याची सोय होईल, असे मंत्री श्री. नाईक यांनी सांगितले.

नागपूर येथील गोरेवाडा प्राणीसंग्रहालयात २० डिसेंबर तसेच २३ डिसेंबर २०२४ रोजी ३ वाघ आणि एका बिबट्याचा मृत्यू हा कोंबडीचे मांस खायला दिल्यामुळे झाले असल्याचे प्राथमिकदृष्ट्या दिसून आले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या कोंबडीच्या मांसामध्ये बुरशीजन्य विषाणूचा प्रादुर्भाव असल्याचे आढळून आले आहे. याबाबतचा वैद्यकीय चाचणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल. कर्तव्यात कसूर करणाऱ्या वन अधिकाऱ्यांना आवश्यकतेनुसार निलंबीत किंवा बडतर्फ करण्यात येईल, असे मंत्री श्री.नाईक यांनी सांगितले.



मंत्री श्री.नाईक म्हणाले की, ब्रम्हपुरी वन विभागाच्या शिंदेवाडी वनपरिक्षेत्रात २ जानेवारी २०२५ रोजी एका वाघाचा नैसर्गिक मृत्यू झाला असून या वाघाच्या शरिराचे सर्व अवयव सुस्थितीत होते. पांढरकवडा वन विभागाच्या वणी वनपरिक्षेत्रात दिनांक ७ जानेवारी २०२५ रोजी एका वाघाचा शिकारीमुळे मृत्यू झाला. या वाघाचे शरीर पूर्णत: कुजलेले असल्याने त्याच्या मृत्यूचे कारण समजले नाही. तथापि, वाघाच्या शरीरातील दात तसेच नखे गायब झाल्याचे निदर्शनास आले आहे. या सर्व प्रकरणावर वन विभाग नजर ठेऊन तपास करत असल्याचेही त्यांनी सांगितले.

जंगलामध्ये लागणारी आग विझविण्यासाठी विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. या विषयासंदर्भात आंतरराष्ट्रीय स्तरावर कशा प्रकारच्या उपाययोजना राबविण्यात येत आहेत त्यांचा अभ्यासही करण्याच्या सूचना दिल्याचे मंत्री श्री.नाईक यांनी सांगितले.

वन्य प्राण्यांच्या हल्लयात झालेल्या मनुष्यहानीसंदर्भात आवश्यक त्या उपाययोजना करण्याबरोबरच योग्य ती नुकसान भरपाई देण्याचा शासन विचार करत आहे. तथापि, बफरझोनमध्ये कोणत्याही व्यक्तीने जाऊ नये, असेही त्यांनी स्पष्ट केले. त्याचप्रमाणे, वनसफारी करतांना काही पर्यटक वन्य प्राण्यांची वाट रोखून त्यांना पाहत असल्याने दिसून आले. यावरही वन अधिकाऱ्यांना लक्ष ठेवण्याचे निर्देश देण्यात आल्याचे वनमंत्री श्री.नाईक यांनी यावेळी सांगितले.

## इंडियन आर्मी डे

१५ ऑगस्ट १९४७ रोजी आपला देश स्वातंत्र्य झाला. देश स्वातंत्र्य करण्यासाठी लाखो ज्ञात – अज्ञात स्वातत्र्य सैनिकांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले. हजारो, लाखो स्वातंत्र्य सैनिकांच्या बलिदानानंतर प्राप्त झालेले हे स्वातत्र्य अबाधित ठेवण्याची जबाबदारी भारतीय लष्कराची आहे.

भारतीय लष्कराने आपली जबाबदारी इमाने इतबारे पार पाडत देशावरील परकीय आक्रमणे रोखून धरले. केवळ रोखून धरलेच नाही तर भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देणाऱ्या शत्रू राष्ट्रांना दाती तृण धरायला लावले. भारतीय लष्करा विषयी देशातील १४४ कोटी जनतेला नितांत आदर आहे. भारतीय लष्कराचे भूदल, नौदल व वायुदल हे तीन प्रमुख विभाग आहेत. भूदल अर्थात भारतीय आर्मीचे जवान देशाच्या सीमेचे रक्षण करतात. आज १५ जानेवारी आजचा दिवस संपूर्ण देशात भारतीय लष्कर दिन अर्थात आर्मी डे म्हणून साजरा केला जातो. चला तर मग आजच्या भारतीय लष्कर दिनानिमित्त आपण या लेखातून भारतीय लष्कराची माहिती घेऊ या. भारतीय लष्कराचा मूळ पाया व अंतर्गत गाभा हा ब्रिटीश आर्मीवर आधारलेला आहे. याच ब्रिटिशांकडून १५ जानेवारी १९४९ ला फिल्डमार्शल (तत्कालीन जनरल) के. एम. करिअप्पा यांनी पदभार स्वीकारला. यामुळे हा दिन भारतीय लष्कर दरवर्षी 'आर्मी डे' म्हणून साजरा करते. भारतीय लष्कर ही प्रशंसनीय काम केलेली सन्माननीय संस्था आहे व आंतरराष्ट्रीय पातळीवरही आपल्या लष्कराला मान आहे. भारतीय लष्कराची एक प्रतिमा आहे, ती चांगली आहे, लष्कराची नेहमीच प्रशंसा झालेली असून लष्कराने देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय आव्हानांचा सामना करताना आदर्श कामगिरी केलेली आहे. संयुक्त राष्ट्रांच्या शांतिरक्षक सेनेत भारतीय लष्कराची मोठी भूमिका आहे, आंतरराष्ट्रीय समुदायाने भारतीय लष्कराच्या कामाची स्तुतीच केली आहे. भारतीय लष्कर हे केवळ शक्तिप्रदर्शनासाठी नाही पण या संस्थेकडे एक परिपक्वता व जबाबदारी आहे. भारतीय लष्कर आज जगातील सर्वात शक्तिशाली लष्कर म्हणून ओळखले जाते. केवळ शत्रू राष्ट्रच नव्हे तर अमेरिका रशिया चीन सारखे मोठे राष्ट्र ही भारतीय लष्कराची क्षमता जाणून आहे. देशातील १४४ कोटी जनतेचे रक्षण करण्यात भारताचे लष्कर सक्षम आहे. भारतीय लष्करातील सर्व जवानांना लष्कर दिनाच्या अर्थात आर्मी डे च्या हार्दिक शुभेच्छा !

## ऑस्कर नामांकनांची घोषणा पुन्हा पुढं ढकलली, जाणून घ्या तारीख...

**मुंबई/प्रतिनिधी :** लॉस एंजेलिसमधील जंगलातील आगीची तीव्रता ९७व्या ऑस्कर पुरस्कारांपर्यंत पोहोचली आहे. अकादमी ऑफ मोशन पिक्चर आर्ट्स अँड सायन्सेसनं पुन्हा एकदा ऑस्कर नामांकनांची घोषणा पुढे ढकलली आहे. ९७वा ऑस्कर पुरस्कार २ मार्च रोजी होणार आहे. दरम्यान सोमवारी अकादमी ऑफ मोशन पिक्चर आर्ट्स अँड सायन्सेसनं एक निवेदन जारी केलं होतं. यात त्यांनी ऑस्कर नामांकन पुढं ढकलण्याबद्दल आणि नवीन तारखेची घोषणा केली आहे. अकादमीचे सीईओ बिल क्रॅमर आणि अकादमीच्या अध्यक्षा जेनेट यांग यांनी निवेदनात म्हटलं आहे की, 'आगीच्या परिणामामुळे आमच्या समुदायातील इतक्या लोकांना झालेल्या गंभीर नुकसानामुळे, आम्ही सर्वजण स्तब्ध झालो आहोत. चित्रपट उद्योगात एकता आणि शक्ती निर्माण झाली आहे. आम्ही अडचणींना तोंड देत एकत्र उभे राहण्यास वचनबद्ध आहोत.'

कधी होणार नॉमिनेशनची घोषणा : सोमवारीच, राइटर्स गिल्ड ऑफ अमेरिकानं नामांकनाची घोषणा पुढं ढकलल्याची माहिती दिली. सुरुवातीला ९ जानेवारी रोजी नियोजित नामांकन प्रक्रिया सोमवारपर्यंत पुढं ढकलण्यात आलं होत. यानंतर दुसऱ्यांदा नामांकन प्रक्रिया पुढं ढकलण्यात आली आहे. ऑस्कर नामांकनांसाठी मतदानाची तारीख १७ जानेवारी २०२५ रोजी संध्याकाळी ५ वाजेपर्यंत वाढविण्यात आली होती. दुसऱ्यांदा नामांकनांच्या घोषणेची तारीख पुढे ढकलण्यात आली आहे. आता २३ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ५.३० वाजता पीटी येथे व्हर्च्युअल पद्धतीनं नॉमिनेशन अनाउंसमेंट केले जाईल.

९७व्या ऑस्कर पुरस्कारचा कार्यक्रम कधी होणार : दरम्यान अकादमीनं वार्षिक नामांकन भोजन कार्यक्रम देखील रद्द केला आहे. ९७ वा ऑस्कर पुरस्कार सोहळा २ मार्च रोजी डॉल्बी थिएटरमध्ये होणार आहे. इथे थेट प्रक्षेपण एबीसीवर संध्याकाळी ७ वाजता ईटीवरून होईल. याशिवाय याचे थेट प्रक्षेपण हुलूवर देखील होणार आहे.

# अमरावतीमध्ये मकरसंक्रांत निमित्त राणा दाम्पत्याकडून पतंग महोत्सवाचे आयोजन

दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** मकरसंक्रांत निमित्त अमरावतीमध्ये राणा दाम्पत्याकडून पतंग महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. आमदार रवी राणा यांनी युवा स्वाभिमान पक्षाची पतंग उडवली तर माजी खासदार नववीत राणा यांनी भाजपाची पतंग उडवली आहे. राणा दांपत्याकडून दरवर्षी पतंग महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. यावर्षी आमदार रवी राणा यांचा युवा स्वाभिमान पक्ष व भाजपाच्या संयुक्त युतीचे पतंग उडवण्यात आले. मेळघाटचे भजपाचे आमदार केवळराम काळे यांनी सुद्धा या पतंग महोत्सवाला हजेरी लावली. नवनीत राणा यांनी यावेळी उखाणा घेत मकर संक्रांतीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.





मी भाजपामध्ये प्रवेश केल्यामुळे यावर्षी भाजप आणि युवा स्वाभिमान पक्षाची पतंग एकत्र उडवली त्यामुळे आकाशात सुद्धा महायुतीचे गटबंधन दिसून आले. राजकारणात लिमिट क्रॉस करून कोणी कोणावर बोलू नये, जे सकाळपासून संध्याकाळपर्यंत खूप कडू बोलतात त्यांना माझा एकच सल्ला आहे तिळगुळ घ्या आणि गोड गोड बोला. माझ्या श्वासापेक्षाही जास्त महत्व रवी राणा यांचं माझ्या जीवनात आहे असे म्हणत शंकराच्या पिंडीवर संत्र्याची फोड रवीजींचं बोलणं साखरपेक्षा गोड असा उखाणा नवनीत राणा यांनी घेतला. तर ही घट्ट महायुती आहे ज्याप्रमाणे आम्ही विधानसभेत अनेकांच्या पतंगा कापल्या, मजबूत उमेदवार भाजपचे निवडून आले, या पतंगीप्रमाणेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे विकासाच्या माध्यमातून मोठी भरारी घेणार आहेत अशी प्रतिक्रिया यावेळी आमदार रवी राणा यांनी दिली आहे.

### गुजरातमध्ये राहू शकत नव्हते तेव्हा बाळासाहेबांनी आश्रय दिला,

# पवारांचा शाहांवर पलटवार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शाह यांनी शिर्डीत झालेल्या भाजपच्या अधिवेशनात शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली होती. त्यावर शरद पवार यांनी अमित शाह यांच्यावर बोचरा वार केला. अमित शाह हे गुजरातमध्ये राहू शकत नव्हते तेव्हा बाळासाहेबांनी आश्रय दिला होता, असे पवार यांनी म्हटले.

मुंबईत ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषद विविध मुद्यांवर भाष्य केले. शरद पवारांनी म्हटले की, परवा, देशाच्या गृहमंर्त्यांनी भाषण केले, त्यात काही विधाने केली. त्यांनी १९७८ सालचा उल्लेख केला. त्यांना माहिती नसेल पण १९७८ साली मी राज्याचा मुख्यमंत्री होतो. जनसंघाच्या लोकांनीदेखील माझ्या बरोबर काम केले आहे. त्यांनी आम्हाला सहकार्य केले होते, अशी आठवणही शरद पवार यांनी शाह यांना करून दिली. आधीच्या काळात देशात पक्ष वेगवेगळी सत्तेत होती. पण राजकीय पक्षातील नेत्यात सुसंवाद होता. उदाहरणच द्यायचं तर वाजपेयी आणि आडवाणी यांचं नाव घेतलं पाहिजे. हे कर्तृत्ववान लोक होते. त्यांच्यातील कोणीही तडीपार नव्हते, असेही पवारांनी सांगितले.

शरद पवार यांनी म्हटले की, आधीच्या काळात विरोधी पक्षांच्या नेत्यातही संवाद होता असेही पवार यांनी म्हटले. आम्ही कधी ही त्यांना (भाजप) कोणताही शब्द दिला नसल्याचेही शरद पवारांनी स्पष्ट केले. शाह यांच्या टीकेवर बोलताना पवार यांनी सांगितले की, त्यांनी केलेली टीका जिव्हारी लागली नाही. पण, नोंद घ्यावी अशी व्यक्ती नाही असा टोलाही पवारांनी म्हटले.

शरद पवार यांनी म्हटले की, अमित शाह यांनी उद्धव ठाकरे यांच्याबाबत वक्तव्य केले. पण, ज्यावेळी गुजरातमध्ये त्यांना राहायला अडचण निर्माण झाली होती. त्यावेळी बाळासाहेब ठाकरे यांच्याकडे मदत मागितली होती. बाळासाहेबांनी त्यांना आश्रय दिला होता, असेही शरद पवारांनी सांगितले.

## म्हाडा बृहतसूचीसाठी मागविणार अर्ज; १५ ते ३१ जानेवारीदरम्यान अर्ज प्रक्रिया; सोडतीद्वारे मूळ भाडेकरूंना घरांचे वितरण

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाच्या संक्रमण शिबिरात वर्षानुवर्षे राहणार्या मूळ भाडेकरूंना हक्काची कायमस्वरूपी घरे देण्यासाठी बृहतसूचीअंतर्गत अर्ज प्रक्रियेस सुरुवात करण्यात येणार आहे. त्यानुसार बुधवार, १५ जानेवारी रोजी जाहिरात प्रसिद्ध करून याच दिवसापासून अर्ज प्रक्रियेस सुरुवात केली जाणार आहे. ही अर्ज प्रक्रिया १५ ते ३१ जानेवारीदरम्यान सुरू राहणार आहे. प्राप्त अर्जांची छाननी करून अर्जदारांना सोडतीद्वारे कायम स्वरूपी हक्काच्या घराचे वितरण केले जाणार आहे.

दक्षिण मुंबईतील जुन्या, मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त अतिधोकादायक आणि कोसळलेल्या इमारतींमधील मूळ भाडेकरूंना दुरुस्ती मंडळाच्या संक्रमण शिबिरात स्थलांतरित करण्यात येते. या मूळ भाडेकरूंच्या इमारतींचा पुनर्विकास झाल्यानंतर ते आपल्या हक्काच्या घरात राहावयास जातात. मात्र मोठ्या संख्येने कोसळलेल्या वा अतिधोकादायक इमारतींचा पुनर्विकास होत नाही. अशावेळी संबंधित इमारतींमधील मूळ भाडेकरूंना संक्रमण शिबिरातच राहावे लागते आणि त्यांचे हक्काच्या घराचे स्वप्न धूसर बनते. ही बाब लक्षात घेता म्हाडाने कोणत्याही कारणाने कधीच पुनर्विकास होऊ न शकणाऱ्या इमारतींमधील मूळ भाडेकरूंना हक्काची घरे देण्यासाठी मास्टरलिस्ट अर्थात बृहतसूची तयार करण्याचा निर्णय घेतला. बृहतसूचीच्या प्रक्रियेनुसार मूळ भाडेकरूंकडून मागवलेल्या अर्जांच्या छाननीअंती पात्र अर्जदारांना सोडतीद्वारे घरे देण्यात येतात. दुरुस्ती मंडळाला उपकरप्राप्त इमारतीच्या पुनर्विकासाद्वारे विकासकांकडून मिळणारी अतिरिक्त घरे या मूळ भाडेकरूंना वितरीत केली जातात.

या बृहतसूचीद्वारे दुरूस्ती मंडळाकडून आतापर्यंत शेकडो मूळ भाडेकरूंना हक्काची कायमस्वरुपी घरे देण्यात आली आहेत. मात्र या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत असल्याचाही आरोप होत आहे. अशी अनेक प्रकरणे समोर आली असून आरोप सिद्धही झाले आहेत. या प्रक्रियेत पारदर्शकता यावी यासाठी आता सोडत आणि बृहतसूचीची संपूर्ण प्रक्रिया संगणकीय करण्यात आली आहे. मात्र संगणकीय पद्धतीने डिसेंबर २०२३ मध्ये काढण्यात आलेल्या सोडतीतही गैरप्रकार झाल्याचा आरोप होत असून त्याची चौकशी सुरू आहे. आता दुरूस्ती मंडळाने शिल्लक आणि मागील दोन वर्षात विकासकांकडून प्राप्त झालेल्या घरांसाठी मूळ भाडेकरूंकडून अर्ज मागविण्याचा निर्णय घेतला आहे. यासंबंधीच्या प्रस्तावाला नुकतीच म्हाडा उपाध्यक्ष संजीव जयस्वाल यांनी मान्यता दिली. त्यानुसार बुधवारी अर्ज मागविण्यासाठीची जाहिरात प्रसिद्ध करण्यात येणार असून बुधवारपासूनच अर्ज स्वीकारण्यास सुरुवात केली जाणार असल्याची माहिती दुरूस्ती मंडळातील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. दरम्यान, अर्ज प्रक्रिया १५ ते ३१ जानेवारीदरम्यान सुरू राहणार असून त्यानंतर अर्जांची छाननी करून पात्रता निश्चिती केली जाणार आहे. पात्रता निश्चिती झाल्यानंतर उपलब्ध घरांसाठी सोडत काढण्यात येणार असल्याचेही अधिकाऱ्यांनी सांगितले.

## प्रभास स्टारर 'द राजा साब' चित्रपटामधील पोस्टर रिलीज, पोंगल आणि मकर संक्रांतीच्या निर्मात्यांनी दिल्या शुभेच्छा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** १४ जानेवारी रोजी देशात, दक्षिणकडे पोंगल साजरा केला जात असून उत्तर भारतात मकर संक्रांती मोठ्या उत्साहात साजरी केली जात आहे. आज सर्वांसाठी खास दिवस आहे. 'द राजा साब'च्या निर्मात्यांनी चित्रपटातील प्रभासचा एक नवीन पोस्टर रिलीज करून चाहत्यांना पोंगल तसेच मकर संक्रांतीच्या चाहत्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. मंगळवारी पोंगलच्या शुभ मुहूर्तावर, प्रभासनं त्याच्या अधिकृत इंस्टाग्रामवर 'द राजा साब' चित्रपटाचे पोस्टर पोस्ट करत कॅप्शनमध्ये लिहिलं, 'या सणासुदीच्या काळात तुम्हा सर्वांना शुभेच्छा... लवकरच भेटू 'द राजा साब'बरोबर.' आता पोस्टवर अनेकजण आपल्या प्रतिक्रिया देऊन प्रभासला त्याच्या आगामी चित्रपटासाठी शुभेच्छा देत आहेत.

'द राजा साब' चित्रपटातील पोस्टर रिलीज : 'द राजा साब'चे दिग्दर्शक मारुती यांनीही प्रभासचे पोस्टर शेअर करत देशवासीयांना मकर संक्रांतीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. त्यांनी एक्सवर पोस्टर शेअर करताना कॅप्शनमध्ये लिहिलं, 'शेवटची संक्रांत, जिथे हे सर्व सुरू झालं. ही संक्रांती, तुम्हाला २०२५मध्ये प्रियेचे सर्वोत्तम रूप देण्याचे वचन देते. संक्रांतीच्या शुभेच्छा.' पोस्टरमध्ये प्रभास हलक्या पिवळ्या रंगाचा कुर्ता घालून दिसत आहे. यावर त्यानं तपकिरी चष्मा घातला असून त्याच्या चेहऱ्यावर मोठे हास्य असल्याचे दिसत आहे.

प्रभासच्या पोस्टरवर चाहत्यांच्या प्रतिक्रिया : प्रभासच्या नवीन लूकवर एका चाहत्यानं लिहिलं, 'हा लूक खूपच छान आहे.' दुसऱ्या एका चाहत्यानं लिहिलं, 'मला वाटतं बाहुबलीनंतर प्रभासचा हा सर्वोत्तम लूक आहे.' अनेक चाहत्यांनी मारुती आणि त्याच्या टीमला पोंगल आणि संक्रांतीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. सध्या 'द राजा साब'च्या नवीन प्रदर्शन तारखेची अनेक चाहते वाट पाहत आहेत. 'द राजा साब'ची रिलीज तारीख पुढे ढकलण्यात आली आहे. हा चित्रपट १० एप्रिल रोजी प्रदर्शित होणार होता, मात्र आता याची रिलीज डेट पुढं ढकलण्यात आली आहे. 'द राजा साब'च्या नवीन प्रदर्शन तारखेबद्दल निर्मात्यांनी अद्याप कोणतीही माहिती दिलेली नाही.

'द राजा साब'बद्दल : मारुती दिग्दर्शित 'द राजा साब' हा एक रोमँटिक हॉरर कॉमेडी चित्रपट आहे. या चित्रपटात प्रभास एका महत्त्वाच्या भूमिकेत आहे. 'द राजा साब' चित्रपटात प्रभास दुहेरी भूमिकेत असणार आहे. या चित्रपटात मालविका मोहनन आणि निधी अग्रवाल यांच्या महत्वाच्या भूमिका आहेत.

# शरद पवारांच्या विश्वासू सहकाऱ्याचं प्रयागराजमधील कुंभमेळ्यात हार्ट अटॅकने निधन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** उत्तर प्रदेशमधील प्रयागराज येथे कुंभमेळ्याचा आज दुसरा दिवस आहे. आजच्या दिवशी पवित्र स्थानासाठी येथे कोट्यवधी भाविकांनी गर्दी केलेली असतानाच महाराष्ट्रातील एका नेत्याचं प्रयागराजमध्ये कुंभमेळ्यात हृदयविकाराच्या झटक्याने निधन झालं आहे. शरद पवारांच्या पक्षाचे नेते आणि सोलापूरचे माजी महापौर महेश कोठेंचं निधन झालं आहे. महेश कोठे हे ५५ वर्षांचे होते. महेश कोठेंचा मृतदेह प्रयागराज येथून सोलापुरात विमानाने आणण्यात येणार आहे.

पवारांच्या विश्वासातील नेता

महेश कोठे हे प्रयागराज येथे कुंभमेळासाठी गेले असताना अचानक त्यांना हृदयविकाराचा झटका आला. त्यातच त्यांचा मृत्यू झाला. शरद पवार यांच्या विश्वासातील नेते म्हणून महेश कोठे यांची ओळख होती. सोलापूर जिल्ह्यातील ज्येष्ठ राजकीय नेता हरपल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

वेवेगळ्या पक्षांमधून राजकारण

महेश कोठे यांनी नुकतीच पार पडलेली विधानसभा निवडणूक सोलापूर उत्तर विधानसभा मतदारसंघातून लढवली होती. मात्र, त्यांना पराभव स्वीकारावा लागला होता. महेश कोठे यांचे सोलापूर शहराच्या राजकारणातील मोठं नाव होतं. सोलापूर महापालिकेच सर्वात तरुण महापौर अशी त्यांची ओळख होती. शिवसेना सोडून राष्ट्रवादीमध्ये जाण्यापूर्वी ते सोलापूर महापालिकेचे विरोधी पक्षनेते देखील होते. काँग्रेस, शिवसेना, राष्ट्रवादी शरद पवार गट अशा विविध पक्षांच्या माध्यमातून कोठेंनी आपला राजकीय प्रवास केला.

महापालिकेमध्ये वर्चस्व राहिलं

महेश कोठे यांनी २०२१ मध्ये शिवसेनेला सोडचिठ्ठी देत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. तेव्हापासून ते राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये कार्यरत होते. राष्ट्रवादीत उभी फूट पडल्यानंतर महेश कोठे शरद पवारांसोबत एकनिष्ठ राहिले. नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून त्यांना उमेदवारी देण्यात आली होती. मात्र, सोलापूर उत्तर मतदारसंघातून महेश कोठे हे विजय देशमुख यांच्याकडून पराभूत झाले. महेश कोठे यांनी चार ते पाचवेळा विधानसभा निवडणूक लढवली पण त्यांना अपयश आलं होतं. मात्र, सोलापूर



महापालिकेच्या राजकारणात त्यांचं वर्चस्व होतं. महेश कोठे यांचे १४–१५ नगरसेवक सोलापूरमध्ये निवडून यायचे. महेश कोठे यांचे पुतणे देवेंद्र कोठे हे विद्यमान आमदार आहेत.

समाजकारणातही सक्रीय

सोलापूर महापालिकेचे महापौर, विरोधी पक्ष नेते, सभागृह नेते अशा विविध जबाबदारी महेश कोठे यांनी पार पडल्या आहेत. सोलापूरमधील राजकारणाबरोबर आणि समाजकारणातील मोठं नाव म्हणून महेश कोठे यांनी सोलापूर आणि आजूबाजूच्या परिसरात ओळख होती.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# सामाजिक न्याय विभागामार्फत राबवण्यात येणाऱ्या योजना गरजुंपर्यंत प्रभावीपणे लाभ पोहोचवा- रामदास आठवले

दैनिक आपला विदर्भ



**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांचा लाभ प्रशासनाने गरजूंपर्यंत प्रभावीपणे पोहोचवा, असे निर्देश केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांनी आज दिले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहामध्ये सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा आढावा घेण्यात आला. महानगरपालिका आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्र कुलगुरू विजय सरवदे, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस अधीक्षक ग्रामीण डॉ. विनयकुमार राठोड, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण प्रदीप भोगले, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक मंगेश केदार, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक अशोक शिरसे यांच्यासह सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

केंद्रशासनातर्फे पंतप्रधान आवास योजना, उज्वला गॅस योजना, जनधन योजना, दिव्यांगांसाठी सहाय्य, आंतरजातीय विवाहासाठी प्रोत्साहनपर अनुदान योजना, ज्येष्ठ नागरिकांसाठी वयोश्री, सामाजिक न्याय विभागामार्फत राबविल्या जातात. या योजना राबवत असताना जिल्हा प्रशासनातील प्रत्येक विभागाने जबाबदारीने काम करणे आवश्यक आहे. सर्वसामान्यांचा जीवनस्तर उंचावण्यासाठी शासन त्यांच्या पाठीशी असून तसा विश्वास अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेने त्यांना द्यावा, असे मंत्री आठवले यांनी सांगितले.

बैठकीत माहिती देण्यात आली की, ग्रामीण भागात रमाई आवास योजना व पंतप्रधान आवास योजना अंतर्गत जिल्ह्याला दिलेल्या उद्दिष्टापैकी ८० टक्के उद्दिष्ट पूर्ण झाल्याची माहिती जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक अशोक शिरसे यांनी बैठकीत दिली. महानगरपालिका क्षेत्रामध्ये ६ हजार १३६ घरकुलांचे उद्दिष्ट पूर्ण केले असून अजून ३० हजार घरकुलांची आवश्यकता असल्याचे मनपा आयुक्त जी. श्रीकांत यांनी सांगितले.

जिल्ह्यात उज्वला गॅस योजनेअंतर्गत १ लाख ७० हजार १५ लाभार्थी असल्याचे जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी यांनी सांगितले. तर जनधन योजनेअंतर्गत १५लाख ३८ हजार लाभार्थ्यांनी बँक खाते उघडले आहे. तसेच मुद्रा योजनेअंतर्गत बेरोजगार तरुणांना रोजगारासाठी सहाय्य उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक मंगेश केदार यांनी सांगितले.

केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी यावेळी जिल्हा परिषद समाज कल्याण विभाग अंतर्गत दिव्यांगांच्या आणि ज्येष्ठांच्या विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या योजना तसेच वयोश्री आणि तीर्थ दर्शन योजनेची अंमलबजावणी, पोलीस प्रशासनामार्फत अनुसुचित जातींच्या संदर्भात झालेल्या गुन्हे व त्याचे तपासकार्य याबाबतची माहिती या बैठकीमध्ये सादर करण्यात आली. आंतरजातीय विवाह केलेल्या जोडप्यांना वेळेवर अनुदानाचा लाभ देण्याचे निर्देश यावेळी केंद्रीय मंत्री आठवले यांनी दिले आहेत.

## महत्त्वाचे...

### नायलॉन मांजामुळे पोलीस उपनिरीक्षकाचा गळा कापल्यानंतर छ. संभाजीनगर पोलीस ॲक्शन मोडवर

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** आज मकर संक्रांत आहे, त्यानिमित्त सर्वत्र पतंगबाजी सुरु असते. त्यामध्ये नायलॉन मांजा वापरण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असल्यामुळे नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. काही दिवसांपूर्वी एका महिलेच्या गळ्याला मांजा लागून ४० टाके पडले होते, तर आज सकाळी एका पोलीस उपनिरीक्षकाच्या गळ्याला नायलॉन मांजा लागून मोठी जखम झाली आहे. आता या पोलीस उपनिरीक्षकाची प्रकृती स्थिर आहे. बंदी असणाऱ्या नायलॉन मांजाची विक्री होत असल्याने पोलीस प्रशासन क्शन मोडवर आले आहे. आज पोलिसांकडून संपूर्ण शहरात पेट्रोलिंग करून प्रत्येक दुकानात प्रत्येक मैदानावर जाऊन या पाहणी करण्यात आली. नायलॉन मांजाने पतंग उडवणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल असे वाहतूक शाखेकडून सांगण्यात आले आहे.

### पाण्यासाठी आदिवासी पाड्यातील ग्रामस्थांचे ग्रामपंचायत कार्यालयाबाहेर ३६ तास ठिय्या आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**भिवंडी/प्रतिनिधी :** भिवंडी तालुक्यातील जूनांदूर्खी टेंभिवली या ग्रामपंचायत हद्दीत रायपाडा, सातवी पाडा, कोदी पाडा, वाघोटे पाडा हे आदिवासी पाडे येत असून येथील सुमारे ६०० च्या जवळपास लोकसंख्या आहे. या पाड्यांवर पिण्याचे पाणी मिळत नसल्याने येथील ग्रामस्थांनी श्रमजीवी संघटनेच्या नेतृत्वात सोमवारी सकाळपासून ग्रामपंचायत कार्यालय समोर ठिय्या आंदोलन सुरू केले आहे. ग्रामस्थांना स्वच्छ व मुबलक पिण्याचे पाणी मिळावे, पाड्यांवर रस्ते व दिवा बत्ती करण्यात यावी अशा माफक मागण्या या आदिवासी वस्तीतील नागरिकांच्या आहेत. या आंदोलनास ३६ तास उलटून गेले त्यानंतर या आंदोलनाची दखल कोणीही घेतली नसल्याने आंदोलकांनी पाणी समस्येची सोडवणूक होत नाही तोपर्यंत आंदोलन सुरूच राहणार असा निर्धार व्यक्त केला आहे.

### आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी विद्यार्थ्याच्या एक्स-गर्लफ्रेंडला अटक; जुळवून घेण्यास दिलेला नकार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** उत्तर प्रदेश पोलिसांनी एका तरुणीला अटक केली आहे. या तरुणीवर एका युवकाला आत्महत्या करण्यास प्रवृत्त करण्याचा आरोप आहे. दोन दिवसांपूर्वी नोएडा येथील एका इमारतीच्या सातव्या मजल्यावरून उडी घेत एका तरुणाने आत्महत्या केली होती. मृत तरुण हा नोएडातील एका खासगी विद्यापीठात कायद्याचा अभ्यास करत होता. या तरुणाच्या पूर्वाश्रमीच्या प्रेयसीला (एक्स-गर्लफ्रेंड) अटक करण्यात आली आहे. ही घटना नोएडा शहरातील सेक्टर ९९ मधील सुप्रीम टॉवरमध्ये घडली आहे. मृत तरुणाचं नाव तपस असं असून तो मूळचा उत्तर प्रदेश राज्यातील गाझियाबादचा रहिवासी होता. सुप्रीम टॉवरमधील एका फ्लॅटमध्ये तो दोन मित्रांबरोबर राहत होता.

मृत तपसच्या वडिलांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यांच्या तक्रारीनंतर पोलिसांनी तपसच्या पूर्वाश्रमीच्या प्रेयसीविरोधात आत्महत्येसाठी प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. त्यानंतर पोलिसांनी त्या तरुणीला अटक केली आहे.

तपसने आत्महत्या केली तेव्हा त्याच्या घरात दोन्ही रूम पार्टनर्सबरोबर त्याची पूर्वाश्रमीची प्रेयसी देखील उपस्थित होती. तपसच्या नातेवाईकांचं म्हणणं आहे की तपस व त्याची पूर्वाश्रमीची प्रेयसी हे दोघेही कायद्याचे अभ्यासक होते. अलीकडेच दोघांच्या नात्यात दूरावा आला होता. दोघांमध्ये भांडणं होत होती. त्यानंतर दोघांचं नातं तुटलं (ब्रेक अप झालं). तपस त्यांचं नातं पूर्ववत (पॅच अप) करण्याचा प्रयत्न करत होता. मात्र, तिने त्याला नकार दिला. तरुणीने तपसबरोबर जुळवून घेण्यास नकार दिला.

दरम्यान, तपसच्या आत्महत्येनंतर फॉरेन्सिक टीमने घटनास्थळाची पाहणी केली. या घटनेचा सखोल तपास केला जात आहे. तपसने आत्महत्या केली तेव्हा त्याच्या घरात किती जण उपस्थित होते? कोण कोण उपस्थित होते? त्यांच्यात काय बोलणं झालं? याबद्दल पोलीस चौकशी करत आहेत. सर्वांचे कबुलीजबाब नोंदवले जात आहेत. पोलीस तपसच्या मित्रांकडे देखील चौकशी करत आहेत. तपसचं त्याच्या पूर्वाश्रमीच्या प्रेयसीबरोबर म्हणजेच आरोपीबरोबरचे चॅट्स तपासत आहेत.



# शून्य आकार असलेल्या पुलावरुन मेट्रो धावणार, मुंबईचे सौंदर्य अधिक वाढवणार



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईत विविध प्रकल्पांचे काम हाती घेण्यात येत आहे. मेट्रो, उड्डाणपूल आणि विविध रस्त्यांचे काम प्रगतीपथावर आहे. लवकरच मुंबईच्या सौंदर्यात भर घालणाऱ्या एक पूल उभारण्यात येणार आहे. वांद्रे-कुर्ला संकुल येथे (वाकोला नाला) शून्य या संकल्पनेचे महत्त्व अधोरेखित करणारा व स्थापत्य कामांतील वास्तुकलेचा एक उत्कृष्ट नमुना ठरेल असा आयकॉनिक केबल स्टेड पूल बांधण्यात येत आहे.

वाकोला नाल्यावर मेट्रो लाइन २ बी व्हायाडक्टच्या शून्य आयकॉनिक ब्रिज या केबल स्टेड ब्रीजचे बांधकाम सुरू आहे. या पुलाची एकूण लांबी १३० मीटर असून ८० मीटर लांबीचा मुख्य स्पॅन व ५० मीटर लांबीचा बॅक स्पॅन प्रस्तावित आहे. उपरोक्त दोन्ही स्पॅन शून्य आकाराच्या पायलॉनवर आधारलेले आहेत.

शून्य पायलॉनची उंची ३९.४६ मीटर व यासाठी वापरण्यात येणाऱ्या स्ट्रक्चरल स्टीलचे वजन सुमारे ७०० टन आहे. एचडीपीई कोटेड स्टील स्पायरल स्ट्रँड केबल्स (स्टे केबल्स) पुलास आधार देण्याचे काम करतील. सद्यस्थितीस सदर पुलाच्या पिअर क्र. ४७८ च्या पायाचे बांधकाम पूर्ण झाले असून दिनांक ०२ ऑक्टोबर २०२४ रोजी पायलॉनच्या २ सेगमेंट उभारणीचे काम यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आले आहे. सद्यस्थितीत या प्रकल्पाचे ५०म काम पूर्ण झाले आहे.

झिरो आयकॉनिक पुलाच्या एका पिलरचे बांधकाम पूर्ण झाले आहे. एमएम आरडीएन ऑक्टोबरमध्ये पायलॉनचे दोन सेगमेंट यशस्वीरित्या पूर्ण केले आहे. या मार्गिकेची सद्यस्थिती ७८ टक्के काम पूर्ण झाले आहे. तर, उर्वरित काम संपवून ही मार्गिका लवकरात लवकर खुली करण्याचा प्रयत्न आहे. त्यासाठी या पुलाचे काम कधी पूर्ण होते हे म हत्त्वपूर्ण ठरणार आहे.

मेट्रो २ ब हा मेट्रो मार्ग कसा आहे?

मेट्रो मार्ग-२ब (डि. एन.नगर-मंडाळे) या मार्गाची एकूण लांबी २३.६ कि. मी. एवढी असून यामध्ये एकूण २० उन्नत स्थानकांचा समावेश आहे. डायमंड गार्डन (चेंबूर) ते मंडाळेपर्यंत ही मेट्रो धावणार आहे. सदर मार्ग हा पश्चिम द्रुतगती मार्ग, पूर्व द्रुतगती मार्ग, पश्चिम रेल्वे, मध्य रेल्वे, मोनोरेल, मेट्रो मार्ग -२अ (दहिसर ते डी एन नगर), मेट्रो मार्ग-३ (कुलाबा ते सिप्झ) आणि मेट्रो मार्ग -४ (वडाळा ते कासारवडवली) या महत्वाच्या मार्गांना जोडणारा आहे.

# ५० हजाराची लाच, पोलीस उपनिरीक्षक प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** बल्लारपूर पोलीस ठाण्यात कार्यरत पोलीस उपनिरीक्षक हुसेन शाह यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने एका वाहतूकदाराकडून ५० हजार रुपयांची लाच घेताना रंगेहात पकडले आहे. या कारवाईने पोलीस विभागात खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे शाह यांनी ३ लाख ८० हजाराची लाच मागितली होती. तेंदूपत्ता वाहतूक करणाऱ्या एका वाहतूकदाराच्या तक्रारीवरून एसीबीने ही कारवाई केली आहे.

तक्रारदार हे चंद्रपूर येथील रहिवासी असून ते व्यवसायाने तेंदूपत्ता वाहतूक करतात. ऑगस्ट महिन्यात या वाहतूकदाराने गडचिरोली येथील एका तेंदूपत्ता व्यापाऱ्याचा माल बल्लारपूर येथील बामणी येथे आणला होता, हा सौदा १९ लाख रुपयांना ठरला होता. परंतु सदर व्यापारी मालाची किंमत व वाहतूक देण्यास टाळाटाळ करीत असल्याने वाहतूकदाराने संबंधित व्यावसायिकाविरुद्ध बल्लारपूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या प्रकरणी बल्लारपूरचे पोलीस उपनिरीक्षक हुसेन शहा यांनी फिर्यादीकडे व्यावसायिकाकडे अडकलेली रक्कम वसूल करण्याच्या बदल्यात ३ लाख ८० हजार रुपयांची लाच मागितली होती. तक्रारीनंतर तेंदूपत्ता व्यापारी आणि वाहतूकदार यांच्यात १६ लाख २५ हजार रुपये किमतीत समझोता झाला असून, व्यापाऱ्याने ही रक्कम वाहतूकदाराला दिली होती. पैसे मिळाल्यानंतर वाहतूकदाराने या व्यावसायिकाविरुद्ध बल्लारपूर पोलिस ठाण्यात दाखल केलेली तक्रार मागे घेण्याचे आवाहन केले, मात्र पोलिस उपनिरीक्षक हुसेन शाह तक्रार मागे घेण्यास तयार नव्हते, त्याबदल्यात पीएसआय शहा यांनी वाहतूकदाराकडे पैशांची मागणी केली मागणी शेवटी वाहतूकदाराने पीएसआयशी ५० हजार रुपये देण्याचे करार केले आणि याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली. एसीबीच्या पथकाने सापळा रचून वाहतूकदाराकडून ५० हजारांची रक्कम स्वीकारताना पोलीस उपनिरीक्षक हुसेन शाह याला रंगेहात पकडले. ही कारवाई पोलीस उपअधीक्षक मंजुषा भोसले व पथकाने केली.

# कल्याण, नवी मुंबई, डोंबिवलीत मोटार सायकल चोरणारे उल्हासनगरमधून अटक

दैनिक आपला विदर्भ



**कल्याण/प्रतिनिधी :** कल्याण, डोंबिवली, नवी मुंबई हद्दीत मोटार सायकलच्या चोऱ्या करणाऱ्या दोन चोरट्यांना मानपाडा पोलिसांनी उल्हासनगर येथून अटक केली आहे. या चोरट्यांनी चार गुन्ह्यांची कबुली दिली आहे. त्यांनी इतर शहरांम ध्ये अशाप्रकारच्या चोऱ्या केल्या आहेत का याचा तपास पोलीस करत आहेत.

ऋतिक बाविस्कर (१९), कुणाल नायडु (१९) अशी पोलिसांनी अटक केलेल्या चोरट्यांची नावे आहेत. पोलिसांनी या दोन चोरट्यांनी चोरी केलेल्या दोन लाख ७० हजार रूपये किमतीच्या चार मोटार सायकल हस्तगत केल्या आहेत. डोंबिवली, कल्याण परिसरात मोटार सायकल चोरीच्या घटना वाढल्या होत्या. म ानपाडा पोलीस ठाणे हद्दीत रात्रीच्या वेळेत घरासमोर, सार्वजनिक रस्त्यावर ठेवलेली दुचाकी चोरून नेण्याचे प्रमाण वाढले होते. या वाढत्या तक्रारींमुळे पोलीस त्रस्त होते. पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी या मोटार सायकल चोरांचा छडा लावण्याचे आदेश म ानपाडा पोलिसांना दिले होते. यासाठी विशेष तपास पथक स्थापन करण्याचे आदेश दिले होते. साहाय्यक पोलीस आयुक्त सुहास हेमाडे, मानपाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांचे विशेष पथक काही दिवसांपासून मोटार सायकल चोरट्यांचा शोध घेत होते. मोटार सायकल चोरी झालेल्या घटनास्थळाचे सीसीटीव्ही चित्रण तपासून पोलिसांच्या दोन तरूण हे प्रकार करत असल्याचे निदर्शनास आले होते.

पोलिसांनी या तरूणांची ओळख पटवली. हे तरूण उल्हासनगर येथील असल्याची खात्री पोलिसांना पटली. सापळा लावून पोलिसांनी त्यांना उल्हासनगर येथून अटक केली. पोलीस निरीक्षक राम चोपडे, जयपालसिंह गिरासे, दत्तात्रय गुंड, साहाय्यक पोलीस निरीक्षक संपत फडोळ, महेश राळेभात, हवालदार सुनील पवार, संजु मासाळ, विकास माळी, शिरीष पाटील, नाना चव्हाण यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# पानिपत शौर्य स्मारकाच्या विकासासाठी सर्वतोपरी सहकार्य – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारणार

### पुतळा उभारणीसाठी राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल समन्वयक






नवी दिल्ली, : मराठ्यांनी राष्ट्र संरक्षणार्थ पानिपतच्या युध्दात जीवाची बाजी लावून लढा दिला. या युद्धाच्या शौर्य स्मारकासाठी महाराष्ट्र शासन सर्वोतोपरी सहकार्य करेल,अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पानिपत येथे दिली.

पानिपत युध्दाला २६४ वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने येथील कालाआम परिसरात आज मराठा शौर्य दिनाचे आयोजन करण्यात आले होते. मराठा वीर योद्ध्यांना अभिवादन करण्यासाठी गत १९ वर्षांपासून पानिपत शौर्य समितीच्यावतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.

याप्रसंगी केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव, केंद्रीय क्रीडा तथा युवक कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे, राज्याचे राजशिष्टाचार तथा पणन मंत्री जयकुमार रावल, माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, खासदार राजाभाऊ वाझे आणि हरियाणा शासनाचे अधिकारी, स्थानिक नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, या युध्द मोहिमेतून त्याकाळी बरेच काही शिकता आले. छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्राला जाती पातीपलीकडे देशासाठी लढण्याची दिलेली शिकवण मावळ्यांनी पाळली आणि म्हणून दिल्लीचे तख्त मराठ्यांनी एकेकाळी राखले. ही एकीची शिकवण कायम ठेवून विकसित महाराष्ट्र आणि भारत घडवूया असेही ते म्हणाले.

या स्मारकासाठी अधिकची जमीन आवश्यक असल्याने त्यासाठी महाराष्ट्र शासन सर्वोतोपरी सहकार्य करेल, असे नमूद करुन या परिसरात छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळाही राज्य शासनातर्फे उभारला जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केली. यासाठी राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल समन्वयक म्हणून काम पाहतील, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव आणि माजी मंत्री रावसाहेब दानवे यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पानिपत शौर्य समितीचे अध्यक्ष प्रदीप पाटील यांनी केले. यावेळी. समितीच्यावतीने अमरावतीचे नितीन धांडे यांना शौर्यस्मारक पुरस्कार प्रदान करण्यात आला.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सशक्त भारत परिवार, मराठा सेवा संघ, हरियाणा समस्त धानक मराठा समाज, धनुष्यधारी धानक समाज, मराठा उत्थान समिती, मुदगल चेतना परिवार चेरिटेबल ट्रस्ट छत्रपती शिवाजी महाराज वेलफेयर संघ, पानिपत सार्वजानिक मराठा गणेश मंडळ, यांनी प्रयत्न केले.

# शेतकऱ्यांनो, पारंपरिक पिकांबरोबर रेशीम शेतीचाही अवलंब करावा-जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

दैनिक आपला विदर्भ

## महारेशीम अभियानाला सुरुवात; जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते रेशीम रथाचे उद्घाटन

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील रेशीम उद्योगाच्या विकास व विस्तारासाठी जिल्हा रेशीम कार्यालयामार्फत ९ जानेवारी ते ९ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत 'महारेशीम अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत आज जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते रेशीम रथाचे उद्धाटन करण्यात आले. शेती उत्पन्नात वाढ करण्यासाठी शेतकऱ्यांनी कापूस, सोयाबीन, गहू, मका, ज्वारी या पारंपरिक पिकांबरोबर रेशीम शेतीचा अवलंब करावा, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी केले.

जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात आयोजित रेशीम रथाच्या उद्धाटनाप्रसंगी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, रेशीम विकास अधिकारी एन.बी. बावगे, जिल्हा रेशीम कार्यालयाचे कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. पाटील म्हणाले की, रेशीम शेतीचा जास्तीत जास्त वापर जिल्ह्यात व्हावे यासाठी शेतकऱ्यांनी प्रयत्नशील राहावे. रेशीम शेती ही किफायतशीर आणि फायद्याचे नगदी पीक आहे. मलबरी रेशीम शेतीपासून पहिल्यावर्षी एकरी जवळपास तीन लाखांचे उत्पन्न मिळण्यास वाव आहे. रेशीम शेतीसाठी केंद्र व राज्य शासनाकडून अनुदान मिळते. एक एकरातील रेशीम शेतीसाठी मनरेगा योजनेंतर्गत लाभ मिळतो. तर त्यापेक्षा जास्त एकरात रेशीम शेती करण्यासाठी केंद्र सरकारच्या समग्र सिल्क योजनेतून पाच लाखापेक्षा जास्त अनुदान मिळते. त्यामुळे शेतकऱ्यांनी रेशीम शेतीचा अवलंब करावा, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले.

राज्यात तुती लागवडीव्दारे रेशीम उद्योग विकास करण्याकरिता महारेशीम अभियान २०२५ राबविण्यात येत असून बुलडाणा जिल्ह्यात हे अभियान राबविण्यासाठी जिल्हा रेशीम कार्यालय, बुलढाणा अंतर्गत ८८ गावात कार्यक्रम घेऊन गावातील शेतकऱ्यांना रेशीम शेती उद्योगाबाबत संपूर्ण माहिती देण्यात येणार आहे. रेशीम शेती उद्योगासाठी इच्छुक शेतकऱ्यांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व सिल्क समग्र योजनेअंतर्गत आपले सरकार पोर्टलवर किंवा संबंधित तालुका कृषी कार्यालय, पंचायत समिती किंवा जिल्हा रेशीम कार्यालय, बुलढाणा कार्यालयास संपर्क करुन लागणारी कागदपत्रे व शुल्क भरून नाव नोंदणी करण्याचे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले.

रेशीम शेतीसाठी शासकीय अनुदान योजनाः रेशीम शेतीसाठी मनरेगा अंतर्गत तुती लागवड व किटक संगोपन गृह बांधकामासाठी एक एकराकरिता तीन वर्षात ४,१८,८१५ रुपयांचे तर समग्र सिल्क-२ योजनेंतर्गत तुती लागवड, किटक संगोपन गृह बांधकाम, किटक संगोपन साहित्य, सिंचन आणि निर्जंतुकीकरण औषधींसाठी एससी/एसटी प्रवर्गांना ४,५०,००० (९०%) रुपये व इतर प्रवर्गांना ३,७५,००० (७५%) रुपये अनुदान दिले जाते. तसेच समग्र सिल्क-२ योजनेंतर्गत



एक एकरात तुती नर्सरी करण्यासाठी एससी/एसटी प्रवर्गांना १,३५,००० रुपये व इतर प्रवर्गांना १,१२,००० रुपये अनुदान तर बाल किटक संगोपन गृह बांधकामासाठी एससी/एसटी प्रवर्गांना ११,७०,००० रुपये व इतर प्रवर्गांना ९,४५,५०० रुपये अनुदान दिले जाते.

नाव नोंदणी करिता लागणारे आवश्यक कागदपत्र : विहित नमुन्यातील अर्ज, जमिनीचा सातबारा व ८अ ऑनलाईन उतारा, चर्तुसोमा नकाशा, पाणी प्रमाणपत्र, राष्ट्रीयकृत बँकेच्या पासबुकची झेरॉक्स, आधार कार्ड झेरॉक्स, मनरेगा जॉबकार्ड झेरॉक्स, रहिवाशी दाखला, अल्प-भू धारक प्रमाणपत्र, आवश्यकतेप्रमाणे जात प्रमाणपत्र, मतदान कार्ड, रेशन कार्ड, ग्राम पंचायत ठराव, रु. १०० रुपयांच्या बाँड पेपरवर करारनामा प्रत ही कागदपत्रे अर्जासोबत आवश्यक आहेत.

शेतकऱ्यांनी एकात्मिक पीक पद्धतीचा अवलंब करुन शेतीवर आधारित जोडधंदा म्हणून रेशीम शेतीकडे वळावे. किमान आठमाही पाणी पुरवठा असलेल्या शेतकऱ्यांनी प्रती एकर ५०० रुपये व लागणारी कागदपत्रे आपले सरकार पोर्टलवर किंवा काही अडचणी आल्यास संबंधित विभागाकडे जमा करुन नाव नोंदणी करावी, असे आवाहन रेशीम विकास अधिकारी एन.बी. बावगे यांनी केले.

## विविध वृत्त...

### जवाहर नवोदय विद्यालय; १८ जानेवारीला निवड चाचणी परीक्षा परीक्षेसाठी भरारी पथकांची नियुक्ती

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जवाहर नवोदय विद्यालयात इयत्ता सहावीच्या २०२५ च्या शैक्षणिक प्रवेशासाठी निवड चाचणी परीक्षा दि. १८ जानेवारी २०२५ रोजी बुलढाणा जिल्ह्यातील ४० परीक्षा केन्द्रावर होणार आहे. या परिक्षेत जिल्ह्यातून १२ हजार ०७३ विद्यार्थी ही परीक्षा देणार आहेत.

जिल्ह्यातील केद्रांवरील परीक्षा सुरळीत, निपक्षपणे पार पाडण्यासाठी तसेच हुशार व गुणवंत विद्यार्थ्यांना त्यांच्या कष्टाचे फळ मिळावे यासाठी परिक्षा दरम्यान कोणताही अनुचीत प्रकार होणार नाही, यांची दक्षता घेतली जाणार आहे. त्यासाठी जिल्हा प्रशासनाकडुन विशेष भरारी पथक व बैठे पथकांची नियुक्ती केली जाणार असुन सदर पथके विविध केंद्रावर भेटी देणार आहेत. परीक्षा केंन्द्रावर विद्यार्थी किंवा इतर कोणाकडुनही गैरप्रकार करतांना आढळल्यास संबधितांवर नियमानुसार कडक कार्यवाही करण्यात येईल, यांची नोंद संबंधीताने घ्यावी. निवड चाचणी परिक्षा शांततेत व सुरळीतपणे पार पाडण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले.

### मोताळा तालुक्यातील अवसायनातील ३४ संस्थांची नोंदणी रद्द होणार; आक्षेप नोंदविण्याचे सहायक निबंधकाचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** मोताळा तालुक्यातील ३४ सहकारी संस्थाची नोंदणी रद्द करण्याची कार्यवाही सहायक निबंधक सहकारी संस्थाव्दारे करण्यात येत आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ चे नियम ८९(४) नुसार अवसायनातील संस्थाशी ज्या कोण्या व्यक्ती वा संस्थेविरुद्ध काही दावे असल्यास त्यांनी जाहिर सूचना प्रसिद्ध झाल्यचे तारखेपासून दोन महिन्याचे आत नोंदवावे लागणार आहे. त्यानंतर दाव्यांची दखल घेतली जाणार नाही, असे मोताळा सहकारी संस्थाचे सहायक निबंधक गजानन आमले यांनी कळविले आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०२ नुसार सहकारी संस्था अंतिम अवसायनात घेण्यात अलेल्या अहेत. या संस्थावर अवसायकाची नियुक्ती यापुर्वीच करण्यात आलेली आहे. यापुढील दाखल केलेल्या दाव्याचे अनुषंगाने कोणत्याही दावा दाखल न झाल्यास त्यांनतर ३४ संस्थांची नोंदणी रद्द करण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.

### सैनिकी मुलांच्या वसतीगृहात चौकिदार पदासाठी २० जानेवारीपर्यंत अर्ज मागविले

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्हा सैनिक कार्यालय बुलढाणा येथे माजी सैनिक, इतर प्रवर्गातुन तात्पुरत्या स्वरुपात मानधनावर कंत्राटी पध्दतीने सैनिकी मुलांचे वसतिगृहात चौकिदाराचे (अशासकिय) एक पद भरावयाचे आहे. सदर पदाकरीता इच्छुक सैन्यदलातील सेवानिवृत्त असलेले व इतर नागरीकाकडून दि. २० जानेवारी २०२५ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत. वैयक्तिक अर्जासोबत अर्जदाराने आधार कार्ड, पॅन कार्ड, बँक पासबुक व दहावी पास प्रमाणपत्र, अर्जदार माजी सैनिक असल्यास पीपीओ, डिस्चार्ज बुक ओळखपत्र जोडावे, अशी माहिती जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी कळविली आहे.

### वझर आघाव येथे अखंड हरिनाम सप्ताहाला सुरुवात

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** १४ जानेवारी पासून संत भगवान बाबा पुण्यतिथी निमित्त वझर आघाव तालुका लोणार जिल्हा बुलढाणा येथे अखंड हरिनाम सप्ताहाला सुरुवात झाली आहे संत भगवान बाबा पुण्यतिथी निमित्त सकाळी ढोलताशांच्या गजरात वझर आघाव येथील जिल्हा परिषद शाळेचे लैझीम पथक ,वारकरी, शिक्षण, संस्था ,शंकर गड जागदरीचे विद्यार्थी गावातील व पंचक्रोशीतील भजनी मंडळ यांच्या समवेत नगर प्रदक्षिणा झाली.तर ह.भ.प.रामायणाचार्य उध्दव महाराज चोले यांच्या राम कथेला सुरुवात झाली.या सप्ताहात ह.भ.प.तुकाराम मुंढे, शास्त्री अक्रुर महाराज साखरे, विशाल महाराज खोले ,अर्जुन महाराज लाड, गुरुजी ज्ञानेश्र्वर महाराज तांबे, हरिचैतन्य महाराज पळसखेड सपकाळ, विलास गेजगे यांचे रोज रात्री आठ ते दहा वाजेपर्यंत हरिकिर्तन होईल रामायणाचार्य उद्धव महाराज चोले यांच्या काल्याच्या किर्तनाने सप्ताहाची सांगता होणार आहे.दरम्यान १८ जानेवारी रोजी श्री क्षेत्र भगवान गडाचे महंत न्यायाचार्य नामदेव महाराज शास्त्री यांचे दहा ते एक प्रवचन होणार आहे.१९ तारखेला रक्तदान शिबिर व २० तारखेला आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे.
पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी या सप्ताहाचा लाभ घ्यावा असे आयोजकांच्या वतीने आव्हान करण्यात आले आहे.



## लग्नाचं आमिष, उकळले लाखो रुपये, पुण्याचा लखोबा लोखंडेचा २५ महिलांना गंडा

दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** लग्न जमवण्यासाठी आजकाल मॅट्रोमोनी साइटचा आधार घेतला जातो. मात्र त्यातूनही फसवणूक होत असल्याचे प्रकार काही नवीन नाहीत. पण पुण्याच्या एका भामट्यानं चक्क २५ महिलांना गंडा घातल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. या भामट्याने मॅट्रोमोनी साइटचा आधार घेऊन आतापर्यंत २५ महिलांना लग्नाचं आमिष दाखवून फसवलं, त्यांच्याकडून पैसे उकळले, त्यांच्यासोबत शारीरिक संबंध ठेवल्याचा भयंकर प्रकार घडकीस आला. शादी डॉट कॉमवर एका घटस्फोटीत महिलेनं आपलं नाव लग्नासाठी नोंदवलं होतं. पुण्यातल्या लखोबा लोखंडेनं या महिलेची माहिती वाचली आणि तिचा नंबर मिळवला. त्यानेही लग्नाची तयारी दाखवली. त्याने या महिलेचा नंबर मिळवला आणि बोलणी सुरू केली. त्याने व्यवसायात अडचणी येत असल्याने महिलेकडून पैशांची मदत घेतली. ही मदत थोडी नाही तर तब्बल १ लाख ५९ हजार रुपयांची रक्कम ८ लाख २५ हजारांचे दागिने उकळले.

## कृषी व पशुसंवर्धन मा. सभापती राजेंद्र पळसकर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा



शुभेच्छुक, देविदास खनपटे मुख्य संपादक

## शेगावातील केसगळती ग्रस्त गावांमध्ये नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ एपिडेमियोलॉजीच्या शास्त्रज्ञांनी तपासणीला केली सुरुवात





दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव तालुक्यातील १५ च्या जवळपास गावांमध्ये केस गळती आणि टक्कल पडण्याच्या प्रकारांमुळे नागरिक त्रस्त आहेत. केंद्रीय आरोग्य मंत्री प्रतापराव जाधव यांनी मुंबई, चेन्नई, दिल्ली येथील तज्ञांद्वारे या गावांच्या रुग्णांची तपासणी केली जाणार असल्याची घोषणा केली होती. त्यानुसार आज सर्व पथके या गावांमध्ये पोहचली आहेत. दरम्यान खउचठ-नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ एपिडेमियोलॉजी, चेन्नई येथील तज्ञ डॉक्टरांनी सुद्धा तालुक्यातील बोंडगाव येथे पोहचून रुग्णांच्या तपासणीला सुरुवात केली आहे, विविध सँपल्स गोळा करण्याचे काम सुरू आहे. संपल्सच्या तपासणीनंतर निष्कर्ष काढले जातील असे या डॉक्टरांनी सांगितले. कितीही दिवस लागले तरी आजाराचा शोध लावूनच या ठिकाणावरून जाऊ अशी प्रतिक्रिया या तज्ञांनी दिली आहे

## मेहकर येथील एमईएस कला व वाणिज्य महाविद्यालयात गुरुवारी रोजगार मेळाव्याचे आयोजन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता मार्गदर्शक केंद्र तथा मॉडेल करिअर सेंटर व एमईएस कला व वाणिज्य महाविद्यालय मेहकर यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१६ जानेवारी २०२५ रोजी मेहकर येथे रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि केंद्र शासनाच्या श्रम आणि रोजगार मंत्रालय अंतर्गत नॅशनल करियर सर्विसच्यावतीने बुलढाणा जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार नोंदणीकृत उमेदवारांना रोजगारांच्या संधी उपलब्ध होण्यासाठी रोजगार मेळाव्याचे आयोजन केले आहे. सदर मेळाव्यामध्ये बुलढाणा अर्बन मल्टिस्टेट को-ऑपरेटीव्ह सोसायटी, सह्योग मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटीव्ह सोसायटी, क्रेडिट ॲक्सेस ग्रामीण कूटा यासारख्या सहापेक्षा अधिक नामांकित उद्योजकांनी त्यांच्याकडील ३७० पेक्षा अधिक रिक्त पदे अधिसुचित केलेली आहे. या मेळाव्याद्वारे नामांकित कंपनी प्रतिनिधीद्वारे गरजु व रोजगार इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येवुन त्यांची प्राथमिक निवड करण्यात येणार आहे.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या https://mahaswayam.gov.in व श्रम आणि रोजगार मंत्रालय भारत सरकार अंतर्गत मॉडेल करीयर सेंटरच्या https://www.ncs.gov.in या संकेतस्थळावर नाव नोंदणी असलेल्या अथवा नसलेल्या दहावी, बारावी, आयटीआय, पदवीधर पुरुष महिला उमेदवारांनी दि. १६ जानेवारी २०२५ रोजी एमईएस कला व वाणिज्य महाविद्यालय, राम नगर बस स्टँडच्या मागे, मेहकर येथे प्रत्यक्ष उपस्थित राहुन रोजगारांच्या संधीचा लाभ घ्यावा.

या रोजगार मेळाव्यात पात्र, गरजु व नौकरी इच्छुक स्त्री-पुरुष उमेदवार आपल्या शैक्षणिक पात्रतेच्या आधारे एकापेक्षा जास्त पदांकरीता सुध्दा अर्ज करु शकतात. तरी आवश्यक कागदपत्रांसह स्वखर्चाने रोजगार मेळाव्याच्या ठिकाणी उपस्थित राहून आपली नाव नोंदणी करावी. तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त उमेदवारांनी या संधीचा लाभ घ्यावा. तसेच अधिक माहितीसाठी या कार्यालयाचा दूरध्वनी २४२३४२ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता मार्गदर्शक केंद्र तथा मॉडेल करिअर सेंटरचे सहायक आयुक्त गणेश बिटोडे यांनी केले आहे.

# प्रवाश्यांच्या समस्या निराकरणासाठी दर सोमवार, शुक्रवारी प्रवासी राजा दिन व कामगार पालक दिन

दैनिक आपला विदर्भ

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा उपक्रम

**बुलढाणा/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ विभागाकडून प्रवाशांना भेडसावणाऱ्या दैनंदिन समस्या, तक्रारी व सुचनांचे आगार पातळीवर जलदगतीने निराकरण करण्यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक आगारात दर सोमवार व शुक्रवारला सकाळी १० ते २ या वेळेत प्रवासी राजा दिन व दुपारी ३ ते ५ या वेळेत कामगार पालक दिन आयोजन करण्यात येत आहे. प्रवाशी आणि महामंडळाचे कामगार यांनी याचा लाभ घेऊन समस्यांचे निराकरण करावे, असे आवाहन परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक यांनी केले आहे.

परिवहन महामंडळाच्या आगारामध्ये सकाळी १० ते दुपारी २ दरम्यान प्रवासी राजा दिन साजरा करण्यात येणार आहे. यावेळेत प्रवासी, प्रवासी संघटना, शाळा-महाविद्यालये त्यांच्या समस्या, तक्रारी, सूचना लेखी स्वरुपात मांडू शकतील. तसेच दुपारी ३ ते सायंकाळी ५ दरम्यान कामगार पालक दिन साजरा करण्यात येणार आहे. संघटना, कर्मचाऱ्यारी वैयक्तिक प्रश्र्न, तक्रारी लेखी स्वरुपात घेऊन तक्रारीचे किंवा समस्यांचे तात्काळ निराकरण करतील.

बुलडाणा विभागातील प्रत्येक आगारामध्ये प्रवासी राजा दिन, कामगार पालक दिन साजरा करण्यात येणार आहे. चिखली आगार येथे शुक्रवार दि. १७ जानेवारी, खामगाव आकार येथे सोमवार दि. २० जानेवारी, मेहकर येथे शुक्रवार, दि. २४ जानेवारी, मलकापूर येथे सोमवार, दि. २७ जानेवारी, जळगांव जामोद येथे शुक्रवार, दि. ३१ जानेवारी व शेगांव येथे सोमवार, दि. ३ फेब्रुवारी रोजी प्रवासी राजा दिन व कामगार पालक दिन कार्यक्रम घेण्यात येणार आहे.

